म मराठी भाषा गौरव दिन

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा,
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा
- कुसुमाग्रज

SUBSCRIBE

• वर्ष : ०३ • अंक : १६१ • पुणे • शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


# भारताने मैदान मारले

## झिम्बाब्वेवर ७२ धावांनी विजय; ब्रायन बेनेटची ९७ धावांची चिवट झुंज



**हार्दिक पंड्या : ५०* धावा**
**(२३ चेंडू, २ चौकार, ४ षटकार)**
**तिलक वर्मा : ४४* धावा**
**(१६ चेंडू, ३ चौकार, ४ षटकार**
**- स्ट्राइक रेट २७५.००)**

**चेन्नई (दै. आरंभ पर्व)**

टी-२० विश्वचषक २०२६ च्या सुपर-८ फेरीतील आपल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय संघाने झिम्बाब्वेवर ७२ धावांनी विजय मिळवत सेमीफायनलच्या आशा पल्लवीत केल्या आहेत. एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर (चेपॉक) प्रथम फलंदाजी करताना भारताने ४ बाद २५६ धावांचा डोंगर उभा केला होता, प्रत्युत्तरात झिम्बाब्वेने

- **अभिषेक शर्माचं दमदार कमबॅक**
- **भारताने झिम्बाब्वेचा काटा काढला; सेमीफायनलच्या दिशेने वाटचाल**

चिवट झुंज दिली आणि २० षटकांत ६ बाद १८४ धावांपर्यंतच मजल मारली. टॉस हरल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरलेल्या भारताची सुरुवात वादळी झाली. संजू सॅमसन (२४) आणि अभिषेक शर्मा (५५) यांनी पॉवरप्लेमध्येच ८० धावा कुटल्या. अभिषेक शर्माने अवघ्या ३० चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५५ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्यानंतर इशान किशन (३८) आणि कर्णधार सूर्यकुमार यादव (३३) यांनी धावगती कायम ठेवली.

डावाच्या उत्तरार्धात हार्दिक पंड्या आणि तिलक वर्मा यांनी झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची पिसं काढली. या जोडीने पाचव्या विकेटसाठी केवळ ३१ चेंडूत ८४ धावांची नाबाद भागीदारी केली.

२५७ धावांच्या अशक्य वाटणाऱ्या लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात संथ झाली. ब्रायन बेनेटने एकाकी झुंज देत ५९ चेंडूत नाबाद ९७ धावांची (८ चौकार, ६ षटकार) शानदार खेळी केली, मात्र त्याला दुसऱ्या टोकाकडून अपेक्षित साथ मिळाली नाही. कर्णधार सिकांदर रझाने ३१ धावांचे योगदान दिले.

भारताकडून अर्शदीप सिंगने ४ षटकांत २४ धावा देत ३ बळी टिपले आणि झिम्बाब्वेच्या मधल्या फळीचे कंबरडे मोडले. अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, शिवम दुबे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पंड्याने शिस्तबद्ध गोलंदाजी करत झिम्बाब्वेला विजयापासून दूर ठेवले.

# मोठा निर्णय : झेडपी आणि पंचायत समित्यांमध्येही स्वीकृत सदस्यांची नियुक्ती

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

जिल्हा परिषद (झेडपी) आणि पंचायत समित्यांमध्येही आता स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

ग्रामविकास विभागाने नुकतेच १२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांमध्ये अध्यक्ष व सभापती निवडीची प्रक्रिया २० मार्चपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर स्वीकृत सदस्यांचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

जिल्हा परिषद निवडणुकांपूर्वी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देत महापालिका व नगरपालिकांप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही स्वीकृत सदस्य नेमण्याची मागणी केली होती. या मागणीवर सकारात्मक विचार करत मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले. स्वीकृत सदस्यांचे प्रमाण किती असावे, याबाबतचा अंतिम निर्णय ग्रामविकास विभागाशी चर्चा करून निश्चित केला जाणार आहे. प्राथमिक चर्चेनुसार, सुमारे ६० ते ६५ सदस्यसंख्या असलेल्या जिल्हा परिषदांमध्ये पाच स्वीकृत सदस्य नेमले जाण्याची शक्यता आहे. ज्या जिल्हा परिषदांची सदस्यसंख्या अधिक आहे, त्या ठिकाणी निवडून आलेल्या सदस्यांच्या प्रमाणात स्वीकृत सदस्यांची संख्या वाढविण्यात येईल. सुरुवातीला १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांमध्ये हा निर्णय लागू होणार असून सार्वत्रिक निवडणुकांनंतर इतर ठिकाणीही त्याची अंमलबजावणी केली जाईल.

नगरपालिकांमध्ये ज्या प्रमाणात निर्वाचित सदस्यांच्या अनुपातात स्वीकृत सदस्य नेमले जातात, त्याच धर्तीवर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठीही समान प्रमाण ठेवण्याचा विचार सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व प्रतिनिधींना संधी मिळणार असून प्रशासनिक कामकाज अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### पंचायत समित्यांमध्येही तरतूद

**मोठ्या पंचायत समित्यांमध्ये दोन, तर लहान पंचायत समित्यांमध्ये एक स्वीकृत सदस्य नेमण्याचा प्रस्ताव आहे. राज्यात सुमारे ७० पंचायत समित्या अशा आहेत जिथे केवळ ४ ते ५ निर्वाचित सदस्य आहेत. अशा ठिकाणी किमान एक स्वीकृत सदस्य असावा, अशी सूचना मंत्रिमंडळ बैठकीत अधिकाऱ्यांनी मांडली.**

# पोलीसांना आरोपींना थेट मारहाण करण्याचे अधिकार नाहीच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यात अलीकडील काळात पोलीसांकडून कथित मारहाण आणि कस्टोडियल अत्याचारांच्या तक्रारी वाढत असल्याचे चित्र समोर येत आहे. आरोपींना चौकशीदरम्यान मारहाण केल्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. कायद्याचे रक्षक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यंत्रणेकडूनच मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्याचे आरोप होत असल्याने हा विषय गंभीर बनला आहे. संविधान प्रत्येक नागरिकाला जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार देते. आरोपी असला तरी त्याच्यावर अमानुष वागणूक देण्यास कायद्यात कुठेही परवानगी नाही. तरीही काही ठिकाणी "तिसऱ्या डिग्री"चा वापर केल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. यामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वासाला तडा जाऊ शकतो, अशी भीती कायदेपंडित व्यक्त करत आहेत. मानवाधिकार कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, चौकशीदरम्यान जबरदस्तीने कबुली मिळवणे हा गुन्हा असून अशा प्रकरणांत संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अनेक वेळा



पीडित व्यक्ती भीतीपोटी तक्रार करण्यास पुढे येत नाहीत, त्यामुळे अनेक घटना दडपल्या जातात, असेही ते सांगतात.दरम्यान, पोलीस विभागातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मात्र स्पष्ट केले की, संपूर्ण यंत्रणेला दोष देणे योग्य नाही. बहुतांश पोलीस अधिकारी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत असून काही अपवादात्मक घटनांमुळे संपूर्ण दलाची प्रतिमा मलिन होते. नियमबाह्य वर्तन करणाऱ्यांवर विभागीय कारवाई केली जाते, असेही त्यांनी नमूद केले. कायदे तज्ज्ञांच्या मते, अशा घटनांवर आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही देखरेख, चौकशीदरम्यान वकिलांची उपस्थिती, नियमित वैद्यकीय तपासणी आणि स्वतंत्र चौकशी यंत्रणा अधिक प्रभावीपणे कार्यरत करणे आवश्यक आहे. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढल्यास नागरिकांचा विश्वास पुन्हा दृढ होऊ शकतो.

# पुण्याच्या पाण्यावर कारभारी मौनात का?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उन्हाळा आला, की दोन गोष्टी दर वर्षी नित्यनेमाने होत असतात. पहिली बाब म्हणजे 'पाणी बचत करा, नाहीतर पाणीकपात करू,' असे भय पुणेकरांना दाखवले जाते. दुसरी गोष्ट जलसंपदा विभाग पुणे महापालिकेला एक नोटीस देते. 'पाणीपट्टीची थकबाकी द्या, नाही तर पाणीपुरवठा बंद करू.' त्यानंतर तात्पुरते वादळ उठते आणि कालांतराने शमते. आता पुणेकरांनाही याची सवय झाली आहे. मात्र, या वेळची परिस्थिती निराळी आहे. पुण्यात एक खासदार, सहा आमदार आणि ११९ नगरसेवक हे भाजपचे. जलसंपदा मंत्रीही भाजपचे ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे-पाटील. त्यामुळे सगळाच कारभार भाजपच्या हाती. तरीही पुणेकरांना या वेळीही जलसंपदा विभागाने दर वर्षीप्रमाणे भीती दाखवलीच; पण त्यावर भाजपचा एकही नेता उघडपणे बोलायला तयार नाही. त्यामुळे पुणेकरांना एक प्रश्न पडला आहे की, कारभारी आणि लोकप्रतिनिधी 'मौनी' का झाले आहेत? राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे जलसंपदा विभागाची बैठक घेतात, तेव्हा पुणेकरांच्या पाणीवापरावर उघडपणे बोलत असतात. पुण्याला पाणी कमी पडू देणार नाही, असे सांगतानाच ते महापालिकेचा पाणीवापर बेसुमार असल्याची जाहीर टीकाही करतात.

# 'राणी लक्ष्मीबाई' योजना प्रशासनच राबवणार

## पुणे महापालिकेच्या पहिल्याच स्थायी समिती बैठकीत वाद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकाच्या नव्या स्थायी समितीच्या पहिल्याच बैठकीत 'राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना'वरून वाद निर्माण झाला. अखेर ठेकेदारांमार्फत योजना राबविण्याऐवजी ती महापालिका प्रशासनानेच क्षेत्रीय कार्यालय स्तरावर थेट राबविण्याचा तोडगा काढण्यात आला.

महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत प्रत्येक प्रभागासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. १५ क्षेत्रीय कार्यालयनिहाय प्रत्येकी ३० लाखांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेत केवळ तीन ठेकेदार सहभागी झाले. त्यापैकी एक अपात्र ठरला, तर उर्वरित दोन बांधकाम कंपन्यांना सुमारे ४ कोटी रुपयांची कामे विभागून देण्यात आली.

मात्र, महिलांच्या सक्षमीकरणासाठीच्या सामाजिक उपक्रमांची जबाबदारी बांधकाम कंपन्यांना देण्यात आल्याने बैठकीत सदस्यांनी आक्षेप घेतला. यावरून तीव्र चर्चा झाली आणि अखेर योजना थेट महापालिका प्रशासनामार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले की, यापूर्वी ही योजना ११ क्षेत्रीय कार्यालयांत राबविली जात होती; यंदा ती १५ कार्यालयांमध्ये राबविण्यात येणार आहे. ८ ते १४ मार्च या कालावधीत विविध उपक्रम आयोजित केले जातील. खर्चास मान्यता देण्यात आली असून पूर्वीप्रमाणे ४ कोटींचा मोठा खर्च होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

'राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना'ची सुरुवात २०१६ मध्ये तत्कालीन स्थायी समिती अध्यक्षा आश्विनी कदम यांच्या पुढाकाराने झाली होती. या योजनेअंतर्गत महिलांसाठी शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, क्षमता बांधणी, आरोग्य शिबिरे व वैद्यकीय तपासण्या आदी उपक्रम राबविले जातात. कोविड-१९ महामारीनंतर २०२० पासून योजना बंद होती. प्रशासक काळात ती पूर्णपणे स्थगित राहिली होती. यंदा नव्या समितीने ती पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

### महापालिकेतील राजकीय समीकरणे

**महापालिकेच्या अलीकडील निवडणुकीत ४१ प्रभागांतील १६५ जागांपैकी भाजपने ११९ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळविले आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस मिळून ३० जागांवर, काँग्रेस १५ जागांवर, तर शिवसेना (ठाकरे) पक्षाचा एक नगरसेवक निवडून आला आहे. स्थायी समितीमध्ये १६ पैकी १० सदस्य भाजपचे असल्याने समित्यांमध्ये भाजपचे वर्चस्व राहणार असल्याचे स्पष्ट आहे. पहिल्याच बैठकीत झालेल्या या वादानंतर प्रशासनाने थेट अंमलबजावणीचा निर्णय घेतल्याने पारदर्शकतेवर भर देण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी योजना प्रभावीपणे राबविली जावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

# संसद-विधिमंडळात एकाच कुटुंबातील पाच सदस्य

## पवारांची घराणेशाही?



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**


राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात पुन्हा एकदा घराणेशाहीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. अजित पवार यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री तसेच पक्षाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आता पुत्र पार्थ पवार यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आल्याने पवार कुटुंबातील सदस्यांची संसदेतील आणि विधिमंडळातील उपस्थिती अधिक ठळक झाली आहे. पार्थ पवार राज्यसभेवर निवडून आल्यास पवार कुटुंबातील पाच जण संसद अथवा विधिमंडळात प्रतिनिधित्व करताना दिसतील.

राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार यांची राज्यसभेची मुदत संपत आली असली तरी ते पुन्हा निवडून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यांची कन्या सुप्रिया सुळे या लोकसभेत बारामती मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. नातू रोहित पवार हे विधानसभेचे आमदार आहेत. सुनेत्रा पवार या सध्या राज्यसभेच्या खासदार आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड झाली असली तरी त्यांनी अद्याप राज्यसभेचा राजीनामा दिलेला नाही. आता पार्थ पवार यांच्या राज्यसभेवरील प्रवेशामुळे पवार घराण्याचे प्रतिनिधित्व अधिक वाढणार आहे.

राज्यसभेच्या निवडणुकीत अजित पवार गटाला एक जागा मिळणार असल्याने पक्षातील इतर इच्छुक नेत्यांकडे दुर्लक्ष करून पार्थ पवार यांना उमेदवारी देण्यात आली. यामुळे पक्षात नाराजीचे सूर उमटत असल्याची चर्चा आहे. यापूर्वी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मावळ मतदारसंघातून पार्थ पवार यांना उमेदवारी देण्यात आली होती; मात्र त्यांचा पराभव झाला होता. लोकसभा निवडणुकीत बारामतीतून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्यात आली होती. भाजपकडून त्यास विरोध झाल्याच्या चर्चाही रंगल्या होत्या. बारामतीत त्यांचा पराभव झाला; मात्र नंतर झालेल्या राज्यसभेच्या पोटनिवडणुकीत त्यांना संधी देण्यात आली. पुढे त्यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड झाली. सुनेत्रा पवार विधानसभेवर पोटनिवडणुकीत निवडून आल्यास त्यांची राज्यसभेची जागा रिक्त होणार आहे. त्या वेळी पक्षातील इतर कोणाला संधी दिली जाणार की दुसरे पुत्र जय पवार यांना पुढे आणले जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. पवार कुटुंबातील पाच सदस्य संसद अथवा विधिमंडळात असणे हा त्यांच्या प्रभावाचा दाखला मानला जातो; मात्र यामुळे पक्षातील इतर नेत्यांच्या संधी कमी होतात का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाचे राजकीय परिणाम काय होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. घराणेशाहीच्या आरोपांमध्ये आणि पक्षनिष्ठेच्या दाव्यांमध्ये राष्ट्रवादीचा अजित पवार गट पुढील राजकीय रणनीती कशी आखतो, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे.

### घराणेशाहीचा व्यापक संदर्भ

**भारतीय राजकारणात घराणेशाही हा नवीन विषय नाही. देशातील अनेक राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांत एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांनी घटनात्मक पदे भूषवली आहेत. प्रादेशिक पक्षांमध्ये पक्षाची सूत्रे कुटुंबातच ठेवण्याचा कल अधिक दिसून येतो. या पार्श्वभूमीवर पवार कुटुंबातील वाढते प्रतिनिधित्व हे समर्थक आणि विरोधक दोघांसाठीही चर्चेचा विषय ठरत आहे.**

# समाविष्ट गावांच्या विकासासाठी भरघोस निधी द्या

## हवेली तालुका नागरी कृती समितीची मागणी

**धायरी - अभिषेक मरगळे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आलेल्या ३२ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करावी, अशी मागणी हवेली तालुका नागरी कृती समितीने केली आहे.



यासोबतच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करावी, अशी मागणीही समितीने केली आहे. समाविष्ट गावांना ग्रामपंचायत कराच्या धर्तीवर दुप्पट कर आकारणीचा निर्णय लागू करण्याबाबतही त्यांनी प्रशासनाला स्मरण करून दिले. महापालिकेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या असून समाविष्ट गावांमधून मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आले आहेत. लवकरच महापालिकेचा अर्थसंकल्प जाहीर होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर धायरी येथे कृती समितीची बैठक आयोजित करण्यात आली. अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस उपाध्यक्ष पोपटराव खेडेकर, मिलिंद पोकळे, संदीप चव्हाण, बाळासाहेब हगवणे, संतोष ताठे आदी उपस्थित होते.

समितीच्या मते, समाविष्ट गावांमध्ये सध्या असमतोल पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, अपुरी ड्रेनेज व्यवस्था आणि कचरा व्यवस्थापनाच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. पायाभूत सुविधांचा अभाव अजूनही कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

### ‘कर वसुली होते, पण निधी परत नाही’

**उपाध्यक्ष पोपटराव खेडेकर यांनी आरोप केला की, “महापालिका या गावांतून कोट्यवधी रुपयांचा कर वसूल करते; मात्र त्यातील निम्माही निधी स्थानिक विकासकामांवर खर्च होत नाही. परिणामी पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सेवा अधिकच बिघडल्या आहेत.” कृती समितीने प्रशासनाला लवकरात लवकर ठोस कृती आराखडा जाहीर करण्याचे आवाहन केले आहे. आगामी अर्थसंकल्पात समाविष्ट गावांच्या विकासासाठी स्वतंत्र आणि भरीव निधी दिला जाईल का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

**अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील म्हणाले, “२०१७ आणि २०२० या दोन टप्प्यांत ३४ गावे पालिकेत समाविष्ट करण्यात आली. त्यापैकी दोन गावांची नंतर स्वतंत्र नगरपालिका करण्यात आली. ग्रामपंचायतींकडून मूलभूत सुविधा मिळत नसल्याने आणि विकासाअभावी बकालपणा वाढल्यामुळे न्यायालयीन लढा देऊन या गावांचा पालिकेत समावेश करण्यात आला. मात्र आजही पायाभूत सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे प्रशासनाने या गावांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करावी.”**

## थोडक्यात पण महत्वाचे



### किल्ले सिंहगड येथे ट्रेकिंग दरम्यान जखमीस ग्रामस्थांची तत्पर मदत

**सिंहगड-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : किल्ले सिंहगड येथे ट्रेकिंगसाठी आलेले नवीन पई (रा. बानेर, वय ५६) हे मित्रपरिवारासह गडावरून खाली उतरत असताना तोल जाऊन पाय घसरल्याने जखमी झाले. गडावरून पाऊलवाटेने साधारण पाऊण किलोमीटर अंतरावर, सडकेच्या मेटाच्या वरच्या भागात ही घटना घडली. या अपघातात त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. तीव्र वेदनेमुळे त्यांना स्वतः चालत खाली येणे शक्य नव्हते. त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ स्थानिक वन विभागाशी संपर्क साधून मदतीचे आवाहन केले. घटनेची माहिती मिळताच वन अधिकारी बळीराम वायकर यांनी तत्काळ हालचाल करत आतकरवाडी-घेरा सिंहगड येथील स्थानिक कार्यकर्ते व वन व्यवस्थापन समितीच्या सुरक्षा रक्षकांना सोबत घेऊन जखमी पर्यटक ज्या ठिकाणी होते, तेथे धाव घेतली. तीव्र उतार, दगडगोट्यांचे खाचखळगे आणि कडक उन्हाची परिस्थिती अशा प्रतिकूल अवस्थेत वन कर्मचारी व गावकऱ्यांनी मोठ्या शर्थीने नवीन पई यांना उचलून सुरक्षितपणे पायथ्याशी आतकरवाडी गावात आणले. या मदतकार्यात वनरक्षक बळीराम वायकर, संदीप कोळी, नितीन गोळे, भानुदास जोरकर तसेच आतकरवाडीचे ग्रामस्थ हनुमंत भोंडेकर, अभिजीत खामकर, गौरव सांगळे, दत्ता नाईलकर, निखिल रांजणे आणि सुरज पन्हाळकर यांनी मोलाची भूमिका बजावली. खडतर वाट, तीव्र ऊन आणि वेळेचे दडपण असतानाही त्यांनी दाखवलेली तत्परता आणि माणुसकी खरोखरच प्रेरणादायी ठरली. सिंहगड परिसरात ट्रेकिंगदरम्यान अपघात झाल्यास स्थानिक ग्रामस्थ दरवेळी मदतीसाठी धावून येतात, हे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी स्थानिक यंत्रणा आणि गावकऱ्यांचे सहकार्य हीच सिंहगड परिसराची खरी ओळख असून, त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे अनेक पर्यटकांचे प्राण वाचले आहेत. आजही ही माणुसकीची परंपरा अखंडपणे सुरू आहे.**

### २ कोटी ३८ लाख फसवणूक प्रकरणी आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

- **अ‍ॅड. कुलदीप नाईकनवरे व अ‍ॅड. राजेश कातोरे यांचा युक्तिवाद यशस्वी**

**पुणे (आरंभ पर्व) : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा 8 ते 10 टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून सुमारे 2 कोटी 38 लाख रुपयांची गुंतवणूक घेऊन फसवणूक केल्याच्या प्रकरणात आरोपीस न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. हा आदेश मा. न्यायाधीश बी. व्ही. वाघ यांच्या न्यायालयाने योग्य अटी व शर्तीसह दिला. या प्रकरणात महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण (वित्तीय संस्थांमधील) अधिनियम, 1999 (MPID Act) अंतर्गत शिवाजीनगर पोलीस स्टेशन व आर्थिक गुन्हे शाखा (EOW), पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीच्या वतीने अ‍ॅड. राजेश कातोरे व अ‍ॅड. कुलदीप नाईकनवरे यांनी न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. आरोपीचा या प्रकरणाशी प्रत्यक्ष संबंध नसून, त्याच्यावर चुकीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आरोपी तपासात पूर्ण सहकार्य करेल व आवश्यक सर्व कागदपत्रे सादर करेल, असा युक्तिवाद अ‍ॅड. राजेश कातोरे यांनी न्यायालयासमोर मांडला. या युक्तिवादास अ‍ॅड. कुलदीप नाईकनवरे, अ‍ॅड. पार्थ बढे व अ‍ॅड. नामदेव मोरे यांनी सहकार्य केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीस योग्य अटी व शर्तीसह अटकपूर्व जामीन मंजूर केला.**



### कोमल कुटे यांची भाजप महिला मोर्चा पुणे शहर उपाध्यक्षपदी निवड

**पुणे (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा, पुणे शहरच्या उपाध्यक्षपदी नऱ्हे परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या, वीरांश युथ फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ.कोमल सतीश कुटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबाबतचे अधिकृत पत्र पक्षाच्या वतीने देण्यात आले.सामाजिक व राजकीय क्षेत्रातील सक्रिय कार्य, संघटन कौशल्य आणि महिलांच्या प्रश्नांबाबत असलेली बांधिलकी लक्षात घेऊन ही जबाबदारी सोपविण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. पुणे शहरात महिला मोर्चाचे संघटन बळकट करण्यासाठी तसेच पक्षाच्या विचारसरणीचा प्रभावी प्रसार करण्यासाठी त्या महत्त्वाची भूमिका पार पाडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. हे नियुक्तीपत्र भाजप पुणे शहर अध्यक्ष श्री. धीरज घाटे तसेच भाजप महिला मोर्चा पुणे शहर अध्यक्षा सौ. मनीषा लडकत यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. सौ.कोमल सतीश कुटे यांच्या निवडीबद्दल नऱ्हे धायरी वडगाव परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध सामाजिक, राजकीय आणि महिला संघटनांकडून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत. पक्षाने दिलेली ही जबाबदारी मी पूर्ण निष्ठा व समर्पण भावनेने आणि संघटन बळ वाढविण्याच्या व सक्षम व सशक्त महिला व समाज विकास या विषयावर जबाबदारीने काम करत हे कार्य दृढ संकल्पाने पार पाडेन असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशन, पुणे आणि विश्व हिंदू जागृती फाऊंडेशन, हिंदुस्तान यांच्या संयुक्त विद्यमाने विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यातील सारसबाग येथील वीर सावरकरांच्या पुतळ्यास भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रखर हिंदुत्ववादी व सावरकरांच्या विचारांचे पाईक असणारे अ‍ॅडव्होकेट व सीए सर्वेश मेहेंदळे यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमास प्रशांत टिकार, फाउंडेशनचे पदाधिकारी प्रीतम थोरवे व नयन ठाकूर उपस्थित होते.



यांप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे देशप्रेम, स्वातंत्र्यासाठीचा त्याग, क्रांतिकारक कार्य व अखंड भारताची संकल्पना यांचा गौरव केला. सावरकरांचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून राष्ट्रहितासाठी त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचे मत सर्वेश मेहेंदळे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

## मातोश्री रुक्मिणी पांडुरंग भोसले स्मृती पुरस्कारासाठी आवाहन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्वकर्मा तरुण मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणारा मातोश्री रुक्मिणी पांडुरंग भोसले स्मृती पुरस्कार यंदाही प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ मधुकर टकले यांनी दिली. या पुरस्कारासाठी साहित्यिकांकडून कादंबरी, बाल साहित्य व ललित साहित्य या प्रकारातील साहित्य मागविण्यात येत आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२५



या कालावधीत प्रकाशित झालेले साहित्य ग्राह्य धरण्यात येणार असून इच्छुक साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या दोन प्रती, अल्प परिचय व छायाचित्रासह पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. हा पुरस्कार मातोश्री रुक्मिणी पांडुरंग भोसले यांच्या स्मरणार्थ साहित्यिक डॉ. जनार्दन पांडुरंग भोसले यांच्या वतीने दिला जात असून पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे आहे. यापूर्वी या पुरस्काराने संतोष गोणबरे, प्रकाश लावंड, सौ. मेघा पाटील, गणपत जाधव, इंद्रजीत घुले, भरत दौंडकर व प्रमोद नारायणे या साहित्यिकांना गौरविण्यात आले आहे.

इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य १० मार्च २०२६ पर्यंत डॉ. जनार्दन पांडुरंग भोसले, सिद्धिविनायक बिल्डिंग, श्री समर्थ कृपा सदनिका क्रमांक बी-२०२, प्रभात प्रेस रोड, शंकर महाराज मठाजवळ, सिद्धी चौक, नऱ्हे, पुणे – ४११०४१ या पत्त्यावर पाठवावे किंवा अधिक माहितीसाठी मोबाईल क्रमांक ८६६९०९१३४९ वर संपर्क साधावा. यावेळी प्रा. बाबुराव इंगळे, श्री. दत्तात्रय पिसाळ, दिनेश आदलिंगे व डॉ. जनार्दन भोसले उपस्थित होते.

# आम्ही रिल स्टार नाही रिअल स्टार

*तृप्ती देसाईंचा बिग बॉसच्या स्पर्धकांना टोला, मांजरेकरांचा व्हिडिओ शेअर करत म्हणाल्या..*

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

बिग बॉस मराठीचा सहावा सीझन सध्या मोठ्या चर्चेचा विषय ठरतोय. काही दिवसांपूर्वी आधीच्या बिग बॉस मधील स्पर्धकांनी एका मुलाखतीमध्ये त्यांच्या पर्वातील अनेक गोष्टींचा उलगडा केला होता. त्यामुळे आधीच्या परवान मधील स्पर्धकही सध्या मोठ्या चर्चेत आहेत. या पार्श्वभूमीवर चौथ्या सीझनमधील स्पर्धक तृप्ती देसाई यांनी एक पोस्ट शेअर केला या सोशल मीडिया पोस्टने नव्या चर्चेला उधाण आलं आहे. “आम्ही रील स्टार नव्हतो, रिअल स्टार होतो,” अशा शब्दांत त्यांनी आपल्या सीझनची तुलना सध्याच्या पर्वाशी केलीय. तृप्ती देसाईंची पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतेय. तृप्ती देसाई या‘बिग बॉस मराठी 4’मध्ये स्पर्धक म्हणून सहभागी झाल्या होत्या. त्यांनी नुकत्याच शेअर केलेल्या पोस्टमध्ये त्या सीझनमधील एक आठवण सांगितली. त्यांच्या मते, बिग बॉसच्या घरातील त्यांचा मोठा आवाज



ऐकून बॉलिवूड अभिनेता सलमान खान यांनी थेट महेश मांजरेकर यांना फोन केला होता. ही गोष्ट महेश मांजरेकर यांनी मिश्किलपणे सांगितल्याचंही त्यांनी नमूद केलं. महेश मांजरेकर यांचा एक व्हिडिओ पोस्ट करत तृप्ती देसाईंनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिलंय, "बिगबॉसच्या घरातील माझा जोरात आवाज ऐकून "सलमान खान" यांचा फोन महेश मांजरेकर सरांना आला होता. आमच्या सिझनसारखी मजा त्यानंतरच्या कोणत्याच सीझनमध्ये अजिबातच नाही हे मात्र तितकच खरं आहे. ते घर आहे.... तिथे माणुसकी, नाती जपणं, टास्क खेळणं, कोणालाही जेवण कमी पडून न देणे हे सर्व सुद्धा पाहणे गरजेचं आहे आणि आम्ही हे सर्व जपण्यात यशस्वी झालेलो होतो. आमचा सीजन संपून तीन वर्ष होऊन गेले परंतु या सर्व गोष्टींमुळे प्रत्येकाला तो सकारात्मकरित्या लक्षात आहे आणि म्हणूनच महाराष्ट्रात सर्वात जास्त प्रेमसुद्धा आम्हाला मिळत आहे, आम्ही रीलस्टार म्हणून नाही "रियल स्टार" म्हणून त्या सीजनमध्ये कंटेस्टंट होतो, याचा प्रचंड अभिमान आहे. असं तृप्ती देसाई म्हणाल्यात.

सध्या सुरू असलेल्या बिग बॉस मराठी 6 मध्ये मोठ्या प्रमाणावर 'रील स्टार्स' म्हणजेच सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स सहभागी झाले आहेत. तृप्ती देसाई यांची पोस्ट ही सध्याच्या स्पर्धकांवर अप्रत्यक्ष टीका असल्याचं मानलं जात आहे. तृप्ती देसाई यांच्या पोस्टची सध्या सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. काहींनी त्यांच्या मताला पाठिंबा दिला. तर काहींनी सध्याच्या स्पर्धकांचं समर्थन केलं.



## जेईई मेन २०२६ मध्ये आकाश इन्स्टिट्यूट पुण्याची शानदार कामगिरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) अंतर्गत पुण्यातील 16 विद्यार्थ्यांनी जेईई मेन 2026 (सेशन 1) मध्ये पुन्हाएकदा उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्यासातत्यपूर्ण यशाची साक्ष दिली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) यांनी16 फेब्रुवारी रोजी जाहीर केलेल्या निकालानुसार, जेईई मेन 2026 मध्येआकाश इन्स्टिट्यूट, पुणे येथील 16 विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. दीक्षांत शर्माने 99.99 पर्सेंटाइलसह टॉप स्कोरर म्हणून आपली चमकदार कामगिरी दाखवली. त्याच्यानंतर तेजस कोरेने 99.78 पर्सेंटाइल, तर पियुष यादवने 99.75 पर्सेंटाइल मिळवले. शिवप्रसाद लक्ष्मण देवकरने 99.71 पर्सेंटाइल मिळवले, तर प्रत्युष आलोक कुमार तिवारीने 99.54 पर्सेंटाइलसह उत्कृष्ट यश संपादन केले. कैवल्य विजय घरगेने 99.44 पर्सेंटाइल मिळवले, तर पार्थ निकमने 99.43 पर्सेंटाइल प्राप्त केले. आर्या दिवेकरने 99.35 पर्सेंटाइल मिळवले. निखिल बेवाल आणि सोहम निशिकांत पाटील या दोघांनीही 99.31 पर्सेंटाइल मिळवले. दिव्या दीपक कटारियाने 99.29 पर्सेंटाइल, तर उत्कर्ष प्रदीप निबेने 99.20 पर्सेंटाइल मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. ओम देशमुखने 99.15 पर्सेंटाइल मिळवले, हसिनी चिक्काला हिने 99.08 पर्सेंटाइल मिळवले, वरद महाडिकने 99.05 पर्सेंटाइल साध्य केले, तर पर्ल सोमाणीने 99.04 पर्सेंटाइल मिळवले. या सर्व यशामुळे जेईई मेन 2026 मध्ये पुणे विभागाची एकूणच भक्कम आणि प्रभावी कामगिरी स्पष्टपणे दिसून येते.

## पुण्याच्या मेट्रो आणि बोगदा प्रकल्पांना विरोध

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या नियोजनाच्या नावाखाली सुरू असलेले अवाढव्य मेट्रो प्रकल्प आणि खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानचा प्रस्तावित बोगदा हे प्रकल्प शहराचा विकास नसून विनाश करणारे आहेत, असा गंभीर आरोप 'ग्रीन थम्स'चे संस्थापक अध्यक्ष निवृत्त कर्नल सुरेश पाटील यांनी केला आहे. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी मेट्रो, वाहतूक कोंडी आणि पाणी प्रश्नावरून प्रशासनावर कडक शब्दांत ताशेरे ओढले. जगभरात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत असताना पुण्यात मात्र अवाढव्य बांधकामे करून सिमेंटचे जंगल उभे केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. मेट्रोच्या दोन्ही बाजूंना ४ एफएसआय (FSI) दिल्याने भविष्यात वाहतुकीचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिक जटील होईल, अशी भीती कर्नल पाटील यांनी व्यक्त केली. तसेच, खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानच्या ३२ कि.मी. लांबीच्या प्रस्तावित बोगद्याला त्यांनी 'मूर्खपणा' संबोधले. "दोन टीएमसी पाणी वाचवण्यासाठी एवढा मोठा खर्च आणि मलब्याचा प्रश्न निर्माण करण्यापेक्षा धरणातील




गाळ काढल्यास साठवण क्षमता वाढेल आणि शेतकऱ्यांचाही फायदा होईल," असे त्यांनी सुचवले. वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून कालव्यालगतचे रस्ते दुचाकींसाठी खुले करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली. शहरातील पाणीटंचाईवर बोलताना त्यांनी प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पुण्यात एकीकडे 'टँकरराज' सुरू असून गरीब महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, तर दुसरीकडे अधिकारी वातानुकूलित दालनात बसून जनसामान्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहेत, अशी टीका त्यांनी केली. "पुढच्या पिढीसाठी राहण्यायोग्य शहर ठेवायचे असेल, तर हे चुकीचे प्रकल्प तातडीने थांबवले पाहिजेत," असे कळकळीचे आवाहन कर्नल सुरेश पाटील यांनी प्रशासनाला आणि पुणेकरांना केले आहे.

# अवघ्या पाच रुपयात तपासणी, औषधोपचार

## उमेश चव्हाण यांच्या पुढाकाराने रुग्ण हक्क परिषदेची आरोग्य चळवळ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गरीब,गरजू,मजूर,वस्ती भागांतील नागरिकांसाठी रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने ‘पृथ्वी मोबाईल क्लिनिक’चा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत अवघ्या पाच रुपयांत आरोग्य तपासणी, औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. या उपक्रमातील १११ वे शिबीर बुधवारी झाले असून, आजअखेर १०,०७७ रुग्णांना याचा लाभ झाला आहे, अशी माहिती रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक उमेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी रुग्ण हक्क परिषदेच्या शहराध्यक्षा अपर्णा साठ्ये-मारणे, डॉ. आदिनाथ लांडे डॉ. अनिकेत मडावी, अमित जागडे, अमोल चव्हाण आदी उपस्थित होते. उमेश चव्हाण म्हणाले, "एकाच ठिकाणी दवाखाना निर्माण केला असता, तर सगळीकडे सेवा देता आली नसती. त्यामुळे मोबाईल क्लिनिकची संकल्पना राबविली जात आहे. सध्या पुण्यातील ६० ठिकाणी ही आरोग्यसेवा दिली जात असून, यामध्ये दोन डॉक्टर, दोन नर्स, वाहनचालक, एक समन्वयक, दोन मदतनीस कार्यरत आहेत. एमआरआय व सिटी स्कॅन यासारख्या तपासण्याची मोफत केल्या जात आहेत. तसेच गंभीर आजारांवर शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे. प्रत्येक वस्तीत महिन्यातून एकदा तपासणी व औषधोपचार केले जात आहेत." "नियमित तपासणीच्या अभावाने मोठमोठे आजार होतात. आजार अंगावर काढणे, वेळेत उपचार झाले नाहीत, तर तो आजार बळावतो. त्यामुळे आजाराच्या प्राथमिक टप्प्यातच रक्त तपासण्या, औषधोपचार घेणे गरजेचे असते. मात्र, झोपडपट्टीतील, गरीब वस्तीमधील नागरिक, हातावर पोट असणारे मजूर आणि वृद्ध नागरिकांना हॉस्पिटल, तपासण्या आणि मेडिकलमधील औषधांचा लाखो रुपयांमध्ये येणारा खर्च परवडणारा नसतो. परिणामी, आरोग्याकडे दुर्लक्ष होते, आजार बळावतो. हे टाळण्यासाठी आणि गरजूंना दर्जेदार उपचार मिळावेत, या भावनेतून रुग्ण हक्क परिषदेच्या माध्यमातून २५ लाखांच्या स्वखर्चाने हा अद्ययावत 'व्हॅनिटी' दवाखाना निर्माण केला आहे. त्यासाठी जनता सहकारी बँकेचे कर्ज घेऊन टाटा विंगर वाहन खरेदी केले आहे," असे अपर्णा साठ्ये-मारणे यांनी सांगितले. कष्टकऱ्यांचे नेते दिवंगत डॉ. बाबा आढाव यांनी १० रुपयात कष्टाची झुणका-भाकर केंद्र सुरु केले होते. तीच प्रेरणा घेऊन गरिबांना चांगले दर्जेदार उपचार, तपासण्या व मोफत औषधोपचार फक्त पाच रुपयात देण्याचा निर्णय रुग्ण हक्क परिषदेतर्फे घेतला. आतापर्यंत १०७ ठिकाणी या फिरता दवाखान्याने सेवा दिली आहे. रुग्ण हक्क परिषदेशी संलग्नित संस्था ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून 'पृथ्वी मोबाईल क्लिनिक' हा फिरता दवाखाना चालवला जात आहे. यासाठी रोजचा खर्च १२ हजार, तर महिन्याचा खर्च तीन लाख ६० हजार रुपये असून, हा खर्च स्वतः उमेश चव्हाण करीत आहेत.

**“गरिबांना वेळेत तपासणी व औषधोपचार मिळाले तर मोठमोठे आजार टाळता येतात. पैशाअभावी कोणाचंही उपचाराअभावी नुकसान होऊ नये, म्हणूनच आम्ही फक्त पाच रुपयांत दर्जेदार सेवा देण्याचा निर्णय घेतला. ही केवळ सेवा नाही, तर आरोग्याबाबत जनजागृतीची चळवळ आहे.”**
**- उमेश चव्हाण, संस्थापक, रुग्ण हक्क परिषद**






दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६









# मन, मेंदू, मनगटात ताकद निर्माण करा - देवेंद्र बुट्टे पाटील

## राजगुरू महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान



**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

आपण पुरुषप्रधान संस्कृतीत वावरत असलो तरी कायद्याने महिलांना संरक्षण आणि न आवडणारी गोष्ट नाकारण्याचा अधिकार दिला आहे. मुलींनी आई - वडिलांचा विश्वास सार्थ ठरवताना आपल्या मन मेंदू मनगटात ताकद निर्माण करून स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय निर्भय कन्या अभियानाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी ॲड. मनीषा टाकळकर, कराटे प्रशिक्षिका काजल बोऱ्हाडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, मुलींनी शिक्षणाच्या माध्यमातून निर्भय व निर्भर व्हावे. मुलींचे शिक्षण व सुरक्षिततेला संस्थेचे प्राधान्य असल्याचेही त्यांनी सांगितले

ॲड. मनीषा टाकळकर यांनी स्त्री हक्क-अधिकार विषयक नियम, संहिता कायदे या विषयावर बोलताना विद्यार्थिनींनी मानसिक, बौद्धिक व शारीरिक दृष्टीने सक्षम असणे आवश्यक असल्याचे सांगितले. महिलांना समानतेचा अधिकार राज्यघटनेने दिला आहे त्यामुळे महिलांसाठी असणाऱ्या कायद्यांविषयी जागृत राहून योग्य निर्णय घ्यायला हवा. विद्यार्थिनींनी कोणत्याही अन्याय, अत्याचार किंवा दबावाला बळी न पडता आपल्या अंगभूत क्षमतांचा विकास करून निर्भयपणे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले

कराटे प्रशिक्षिका काजल बोऱ्हाडे यांनी महिला स्वसंरक्षण या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षणाची प्रात्याक्षिके सादर केली. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थिनींना स्वतःबद्दलचा आदर आणि चारित्र्य जपण्याचे आवाहन केले.

या अभियानात सुमारे २०० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. सोनल धानापूने, परिचय प्रा. जयश्री गोगावले यांनी तर प्रास्ताविक व आभार डॉ. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

# अखेर प्रभाग क्रमांक २८ सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयास जोडला

- **ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पाठपुराव्याला यश**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक २८ मधील नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय घेत अखेर संबंधित परिसर पुन्हा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयास जोडण्यात आला आहे. मध्यंतरी प्रशासकीय बदलांमुळे टिळक रोड ते पर्वती हा भाग विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाशी जोडण्यात आला होता.

त्यामुळे जनता वसाहत, दांडेकर पूल, पानमळा, दत्तवाडी आणि गणेश माळ परिसरातील नागरिकांना विविध कामांसाठी लांब अंतरावर जावे लागत होते. नागरिकांची ही गैरसोय लक्षात घेऊन नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप आणि यांनी सातत्याने पुणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा केला. त्यांनी निवेदने देऊन संबंधित भाग पुन्हा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयास जोडण्याची मागणी केली होती.

**"प्रभाग क्रमांक २८ मधील नागरिकांची गैरसोय दूर व्हावी यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. प्रशासनाने नागरिकांच्या हिताचा विचार करून सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाशी पुन्हा जोडण्याचा निर्णय घेतला, ही समाधानाची बाब आहे. यामुळे नागरिकांची कामे जलद गतीने होऊन त्यांना मोठा दिलासा मिळेल," असे ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी सांगितले.**

त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेत प्रभाग क्रमांक २८ पुन्हा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाशी जोडला आहे.या निर्णयामुळे आता नागरिकांची विविध प्रशासकीय कामे स्थानिक पातळीवरच होणार असून त्यांचा वेळ आणि श्रमाची बचत होणार आहे. या निर्णयाबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत ॲड. प्रसन्नदादा जगताप आणि वृषाली रीठे यांचे आभार मानले आहेत.



# राजगुरुनगर ते अकोला एसटी बससेवेचा प्रारंभ

## प्रवाशांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील राजगुरूनगर एसटी बसस्थानकावरून राजगुरुनगर ते अकोला या एसटी बससेवेचा प्रारंभ करण्यात आला असून या एसटी बससेवेला प्रवाशांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. आगारव्यवस्थापक विद्या कदम व प्रवाशी यांच्या हस्ते गाडीचे पूजन करुन बस मार्गस्थ करण्यात आली. प्रवाशांच्या मागणीनुसार या बससेवेचा प्रारंभ करण्यात आला असून राजगुरूनगर एसटी बसस्थानकावरून दररोज सकाळी सात वाजता ही बस अकोलाकडे चाकण, शिक्रापूर, शिरूर, अहिल्यानगर, संभाजीनगर, चिखली, खामगाव यामार्गे मार्गस्थ होत आहे. तसेच अकोला येथे मुक्कामी ही बस पोहचल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता राजगुरुनगरकडे परतीच्या प्रवासाला निघत आहे, असे यावेळी बोलताना आगारव्यवस्थापक विद्या कदम यांनी सांगितले. राजगुरूनगर, चाकण, शिरूर या भागात नोकरीव्यवसायानिमित्त खामगाव, नागपूर, अकोला, चिखली या भागातील अनेक नागरीक वास्तव्यास आहेत. या प्रवाशांना या बससेवेमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. सर्व थांब्यांवर थांबणारी, सर्व प्रकारच्या तिकीटदरातील सवलती व प्रचलित साध्या बसच्या तिकीटदरामुळे ही बस अल्पावधीत लोकप्रिय झाली आहे. या बससेवेच्या मार्गस्थ होताना प्रारंभी पुजन करण्यात आले. तसेच चालक वाहकांना सन्मानित करण्यात आले. यावेळी आगारव्यवस्थापक विद्या कदम, स्थानक प्रमुख उत्तम लांडे, वाहतूक निरीक्षक नासिर हवालदार, वरिष्ठ लिपीक स्नेहा कातोरे, वाहतूक नियंत्रक चंद्रकांत लोखंडे, मोहन गोपनारायण व प्रवासी आदी उपस्थित होते.

# १०व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदेचे पुण्यात आयोजन



**पुणे-महेश वरवटे (दै. आरंभ पर्व)**

चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूट तर्फे पुण्यात जे. डब्ल्यू भरिएट येथे 13 ते 15 मार्च 2026 दरम्यान 10 व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषद - 2026 (इंटरनॅशनल डायबेटिस समिट) चे आयोजन करण्यात आले आहे. मधुमेह आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचा व गुंतागुंतींचा सामना करण्यासाठी असलेल्या योग्य उपाययोजना जाणून घेण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्‌द्घाटन महाराष्ट्र वैहाकीय परिषद, मुंबई वेवील प्रशासक व केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या राष्ट्रीय सीकल सेल निर्मूलन अभियानाचे सदस्य व बॅलेसेमिया ॲन्ड सीकल सेल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. विकी रूघवानी यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेत मधुमेहाच्या गुंतागुंतीचे व्यवस्थापन, किफायतशीर दरात मधुमेह उपचार, नवीन संशोधन आणि मधुमेह व्यवस्थापनातील तंत्रज्ञानाची भूमिका या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. या परिषदेमध्ये कृत्रिम बुध्दिमत्ता व मधुमेह आणि मधुमेह व्यवस्थापनामध्ये फॅटी लिव्हर (यकृताचा विकार) या विषयांवर कार्यशाळा, तसेच एंडोकोनोलॉजी व महिला आरोग्य या विषयावर परिसंवाद देखील घेण्यात येणार आहेत.


## ग्रामपंचायत होलेवाडी ता. खेड, जि. पुणे.

**कामगार भरती खुली निविदा सुचना क्र.१/२०२५/२६**

ग्रामपंचायत होलेवाडी, ता. जि.पुणे यांच्या तर्फे कार्यालयीन कामकाजासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी भरती करावयाची आहे. त्यासाठी खालील अटी व शर्तीनुसारआहे. योग्य पात्र उमेदवारांकडून अर्ज विहीत कागदपत्रांसह मागविण्यात आलेले आहे. कोऱ्या अर्जाचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय होलेवाडी येथे दि.२७/०२/२०२६ ते १०/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ०५ या वेळेत उपलब्ध करून देण्यात येतील. व इच्छुक उमेदवार यांच्याकडून पाठविण्यात आलेले अर्ज दि.२७/०२/२०२६ ते १०/०३/२०२६ पर्यंत सायंकाळी ०५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. सदर अर्जांची छाननी करून १०० गुणांची लेखी परिक्षा व मुलाखत घेऊन अंतिम निवड होलेवाडी ग्रामपंचायतीच्या पुढील मासिक सभेमध्ये करण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | अर्ज फी | प्रवर्ग | प्रती महिना वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नळ पाणीपुरवठा अर्ध कुशल कर्मचारी | सर्व साधारण १८ ते ३८<br>१) इतर मागासवर्गीय प्रवर्ग पाच वर्ष शिथिलक्षम व अपंग इतर संवर्गासाठी आवश्यक वयोमर्यादा व इतर बाबी शासकीय नियमानुसार लागू | ९वी पास | १००/- | सर्वसाधारण पुरूष | ९१०० |

टिप :

१) इच्छुक उमेदवार/ अर्जदार यांना पदाचे अर्ज अर्जदार यांनी आवश्यक ती फी ग्रामपंचायत होलेवाडी ता. खेड, जि. पुणे येथील कार्यालयात अर्ज फी भरून उपलब्ध करून घ्यावेत. अर्ज सादर करताना अर्ज अचूक भरावा, खाडाखोड करू नये.
२) अर्जासोबत शैक्षणिक, वयाचे, जातीचे इतर आवश्यक कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.
३) अर्जदार यांनी त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुकची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे.
४) उमेदवार हा ग्रामपंचायत होलेवाडी गावचा रहिवासी असावा. त्यासाठी रहिवासीसाठीचे आवश्यक ते वैध पुरावे उदा. मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड इत्यादी पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
५) सदरचे भरतीबाबत जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती खेड, पुणे यांजकडून प्राप्त होणाऱ्या सूचना अर्जदार यांचे वर बंधनकारक राहतील.
६) संबंधित पदासाठी कामकाजाचा किमान दोन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक व त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
७) संबंधित कर्मचाऱ्याची ६ महिन्यांची समाधानकारक सेवा पाहून निश्चित करणेबाबत उचित निर्णय घेण्यात येणार आहे.
८) कोणतेही कारण त नेता कोणताही उमेदवारी अर्ज अथवा सर्वच उमेदवारी अर्ज नाकारण्याचा अधिकार / हक्क ग्रामपंचायत होलेवाडी, ता. खेड, जि.पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत होलेवाडी ता. खेड, जि. पुणे.
सही/- सरपंच, ग्रामपंचायत होलेवाडी ता. खेड, जि. पुणे.


# पुण्यातून आलेल्या तिघांकडून युवकावर गोळीबार

- **दैव बलवत्तर म्हणून वाचला; बार्शी हादरली, पोलीस घटनास्थळी**

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यातून आलेल्या तीन अनोळखी युवकांनी बाळासाहेब उकिरडे याला जबर मारहाण केली. त्यानंतर त्याच्या दिशेने गोळीबार केला. मात्र निशाणा चुकल्याने बाळासाहेब उकिरडे यांचा जीव वाचला. या मारहाणीत बाळासाहेब उकिरडे गंभीर जखमी झाले आहेत. बार्शी तालुक्यातील कुसळंब गावात हा धक्कादायक प्रकार घडला आहे.

पुण्यातून आलेल्या तिघांकडून बाळासाहेब उकिरडे यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्याचे दिशे गोळीबार देखील केला, मात्र, निशाणा चुकल्याने बाळासाहेब उकिरडे यांचा जीव वाचला. मात्र त्यांनी जबर मारहाण झाली आहे. त्यामध्ये ते जखमी झाले आहेत. या घटनेनंतर बार्शीत खळबळ उडाली असून जखमी युवकावर उपचार सुरु असून, हा हल्ला केलेले तिन्ही आरोपी फरार झाले आहेत. त्यांच्या शोधासाठी बार्शी तालुका पोलिसांनी तात्काळ पथक रवाना केले असून, आरोपीचा शोध सध्या घेतला जात आहे. कल्याण शहरातील मच्छी मार्केट परिसरात फरदीन शेख या विद्यार्थ्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. केवळ आम्हाला काय बघतोस? असा जाब विचारत दोन तरुणांनी विद्यार्थ्यावर चॉपरने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात विद्यार्थ्याला गंभीर दुखापत झाली आहे. मारहाण करणाऱ्या तरुणांपैकी एक अल्पवयीन आहे. कल्याण पश्चिमेतील मच्छी मार्केट परिसरात राहणारा फरदीन शेख हा विद्यार्थी आपल्या लहान बहिणींला शाळेत सोडून घरी परत येत असताना दोन तरुणांनी त्यातील त्याची दुचाकी अडवली. तू आम्हाला काय बघत होता असे बोलत या तरुणांनी फरदीन याला मारहाण केली. फरदीन घरी आला आणि आपल्या एका मित्रासोबत मारहाण करणाऱ्या तरुणाच्या घरी गेला आणि त्यांना विचारले की मला का मारहाण केली आहे. या तरुणांना एवढा राग आला की जवळ असलेल्या एका अल्पवयीन मुलाने आपल्या जवळील असलेल्या चाकूने फरदीनवर प्राणघातक हल्ला केला.


## ग्रामपंचायत होलेवाडी ता. खेड, जि. पुणे.

**कंत्राटी कामगार भरती खुली निविदा सुचना क्र.२/२०२५/२६**

ग्रामपंचायत होलेवाडी, ता. जि.पुणे यांच्या तर्फे कार्यालयीन कामकाजासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी कंत्राटी भरती करावयाची आहे. त्यासाठी खालील अटी व शर्तीनुसार योग्य पात्र उमेदवारांकडून अर्ज विहीत कागदपत्रांसह मागविण्यात आलेले आहे. कोऱ्या अर्जाचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय होलेवाडी येथे दि.२७/०२/२०२६ ते १०/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ०५ या वेळेत उपलब्ध करून देण्यात येतील. व इच्छुक उमेदवार यांच्याकडून पाठविण्यात आलेले अर्ज दि.२७/०२/२०२६ ते १०/०३/२०२६ पर्यंत सायंकाळी ०५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | अर्ज फी | प्रवर्ग | कामाचा कालावधी | प्रती महिना वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लिपिक/ वसुली कारकून | सर्व साधारण १८ ते ३८<br>१) इतर मागासवर्गीय प्रवर्ग पाच वर्ष शिथिलक्षम व अपंग इतर संवर्गासाठी आवश्यक वयोमर्यादा व इतर बाबी शासकीय नियमानुसार लागू | १२ वी उत्तीर्ण, संगणक ज्ञान / MSCIT) शासकीय संगणक टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण | १००/- | सर्वसाधारण महिला | ११ महिने | ९००० |

टिप :

१) इच्छुक उमेदवार/ अर्जदार यांना पदाचे अर्ज अर्जदार यांनी आवश्यक ती फी ग्रामपंचायत होलेवाडी ता. खेड, जि. पुणे येथील कार्यालयात अर्ज फी भरून उपलब्ध करून घ्यावेत. अर्ज सादर करताना अर्ज अचूक भरावा, खाडाखोड करू नये.
२) अर्जासोबत शैक्षणिक, वयाचे, जातीचे इतर आवश्यक कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.
३) अर्जदार यांनी त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुकची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे.
४) उमेदवार हा ग्रामपंचायत होलेवाडी गावचा रहिवासी असावा. त्यासाठी रहिवासीसाठीचे आवश्यक ते वैध पुरावे उदा. मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड इत्यादी पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
५) सदरचे भरतीबाबत जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती खेड, पुणे यांजकडून प्राप्त होणाऱ्या सूचना अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.
६) संबंधित पदासाठी कामकाजाचा किमान दोन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक व त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
७) संबंधित कर्मचाऱ्याची ६ महिन्यांची समाधानकारक सेवा पाहून निश्चित करणेबाबत उचित निर्णय घेण्यात येणार आहे.
८) कोणतेही कारण त नेता कोणताही उमेदवारी अर्ज अथवा सर्वच उमेदवारी अर्ज नाकारण्याचा अधिकार / हक्क ग्रामपंचायत होलेवाडी, ता. खेड, जि.पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत होलेवाडी ता. खेड, जि. पुणे.
सही/- सरपंच, ग्रामपंचायत होलेवाडी ता. खेड, जि. पुणे.

## ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.

**B-1 पेपर नोटीस क्र.५, सन २०२५-२६**

ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे. यांचेकडून खालील नमुद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पध्दतीने (तीन सिलबंद लिफाफा पध्दतीने) जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे. दिनांक २७/०२/२०२६ ते दिनांक ०६/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाचे दिवशी सकाळी १०.०० वा. ते सायंकाळी ०६.०० वा. पोष्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभेचे दिवशी ग्रामपंचायतचे सोयीनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ठेकेदाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | Repair To Dapodi Water Supply Scheme | २,४९,१५६/- | १००/- | सूट | सु. बे. अभियंता |
| २ | Repair To Dapodi Pipeline Water Supply Scheme | १,९९,९२६/- | १००/- | सूट | सु. बे. अभियंता |
| ३ | Bhandwalkar Wasti And Anganwadi School Water Supply Scheme | १,१४,२०८/- | १००/- | सूट | सु. बे. अभियंता |

निवेदेच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे : १) कोणत्याही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत दापोडी, पी.डी.सी.सी. बँक, शाखा केडगांव खाते क्र. ०२२००२५००००००१४ वर किंवा ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पुर्वी केलेल्या कामांचे पुर्णत्वाचे दाखले जोडावे. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत दापोडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्य. सह. बँक, शाखा केडगांव, खाते क्र. ०२२००२५००००००१४ खाती भरण्याची पावती जोडण्यात यावी, किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश / डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रीकी लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल. आपण सर्व नियमांस पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदेबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा तसेच कोणतीही निविदा स्विकारणेचा व नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत दापोडी यांनी राखून ठेवला आहे.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.
सही/- सरपंच, ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शिवशाही वारकरी भूषण पुरस्कार ह.भ.प आशाताई हनमघर यांना प्रदान

सिंहगड (आरंभ पर्व) : शिवशाही संघटना महाराष्ट्र राज्य आयोजित शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहात कात्रज येथे संपन्न झाला या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आहे. त्यामध्ये पुणे जिल्हा व महाराष्ट्र भर संत साहित्याचा प्रसार करणाऱ्या नामवंत कीर्तनकार सौ. ह.भ.प आशाताई अक्षय हनमघर यांना 'शिवशाही वारकरी भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. गेली अनेक वर्षांपासून आपल्या किर्तनामधून समाजप्रबोधन,जनजागृती, संतसाहित्याचा प्रचार प्रसार हा कीर्तनकार हनमघर यांनी केला आहे,या कार्याची दखल घेत संघटनेच्या वतीने हा पुरस्कार त्यांना देऊन सन्मानित केले असल्याचे,संघटनेचे संस्थापक अमित थोपटे यांनी सांगितले.'शिवशाही संघटनेने दिलेल्या या 'शिवशाही वारकरी भूषण पुरस्काराने' माझ्यावरची जबाबदारी जास्त वाढली आहे,हा पुरस्कार मला कायम प्रेरणा देत राहील,असे मत कीर्तनकार आशाताई हनमघर यांनी व्यक्त केले. या प्रसंगी शिवशाही संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अमित थोपटे, उपाध्यक्ष सचिन मांगडे, रोहिदास बापू चोरघे, मृदंगमणी अक्षय हनमघर,संघटनेचे पदाधिकारी, शिवभक्त व शिवप्रेमी मोठया प्रमाणात उपस्थित होते.




### पुंछ मध्ये उभा राहणार छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा

पुणे (आरंभ पर्व) : छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, शौर्य, कीर्ती जगमान्य आहे. त्यामुळे त्यांचे स्मारक भारतीय जवानांसाठी स्फूर्ती आणि प्रेरणादायी ठरणार आहे. आम्ही पुणेकर संस्थेच्या वतीने ९ मराठा रेजिमेंट पुंछ जम्मू कश्मीर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अश्वारूढ पुतळ्याचे उद्‌घाटन होणार आहे, अशी माहिती आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला आम्ही पुणेकर चे विश्वस्त अखिल झांजले, विपुल कांबळे, अँड मिलिंद पवार, अभयराज शिरोळे, श्याम दौडकर, ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर आदी उपस्थित होते. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत महाराष्ट्रातील ११ किल्ले आहेत. साल्हेर, शिवनेरी, लोहगड, रायगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, खांदेरी, राजगड, प्रतापगड आणि तामिळनाडू येथील जिंजी अशा १२ किल्ल्यांचा समावेश आहे. त्यामुळे स्मारकाच्या भूमिपूजनासाठी महाराष्ट्रातील अकरा गड किल्ल्यांची माती आणि पाणी नेण्यात येणार आहे.

### पुण्यात 'Oslo: A Tail of Promise' चित्रपटाचा भव्य प्रीमियर




पुणे (आरंभ पर्व) : गोव्यात गेल्या नोव्हेंबरमध्ये पार पडलेल्या International Film Festival of India (IFFI) च्या ५६व्या आवृत्तीत भावनिक प्रतिसाद मिळाल्यानंतर Oslo: A Tail of Promise या चित्रपटाचा पुण्यात शनिवारी भव्य प्रीमियर झाला. या सोहळ्याला चित्रपटातील कलाकार, तांत्रिक टीम तसेच सादरकर्ते आणि निर्माता जॉन अब्राहम उपस्थित होते. खऱ्या घटनांवर आणि वास्तव अनुभवांवर आधारित हा नॉन-फिक्शन चित्रपट माणूस, प्राणी आणि निसर्ग यांच्यातील नात्याचा भावनिक प्रवास मांडतो. जखमी भूतकाळ असलेला सायबेरियन हस्की 'ओस्लो' आणि स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेत असलेली पूजा यांच्यात निर्माण होणाऱ्या नात्यातून प्रेम, जिद्द आणि परस्पर उपचारांची प्रभावी कथा उलगडते. प्राणी आणि माणूस यांच्यातील सहअस्तित्वाचा संदेश देत हा चित्रपट निसर्गाशी असलेल्या मानवी नात्याला अधोरेखित करतो. चित्रपटात Protecterra Ecological Foundation च्या संस्थापिका पूजा आर. भाले आणि 'ओस्लो' यांच्यातील अतूट नातं केंद्रस्थानी आहे. समाजाच्या चौकटींपलीकडे जाऊन निसर्गासोबत जगण्याचा त्यांचा प्रवास या चित्रपटातून संवेदनशीलपणे मांडण्यात आला आहे.

### PURE EV नेवासा दाखल; ई-मोबिलिटीला मिळणार नवी गती




नेवासा (आरंभ पर्व) : भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या PURE EV कंपनीने नेवासा येथे आपल्या नव्या शोरूमचे उद्‌घाटन करून ग्रामीण व उपनगर भागात ईव्ही क्रांतीला नवी चालना दिली आहे. गांधी नगरसमोर, विकास फर्निचरजवळ नेवासा-नेवासा फाटा रोड येथे सुरू झालेल्या या शोरूममध्ये कंपनीच्या अत्याधुनिक इलेक्ट्रिक स्कूटर्स व मोटारसायकल्सची संपूर्ण श्रेणी उपलब्ध करण्यात आली आहे. नवीन शोरूममध्ये लोकप्रिय ePluto 7G Max आणि eTryst X यांसारखी मॉडेल्स ग्राहकांसाठी प्रदर्शित करण्यात आली असून, स्थानिक नागरिकांना पर्यावरणपूरक आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. यासोबतच PuREPower या ऊर्जा साठवणूक उत्पादनांचीही (Energy Storage) श्रेणी येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे घरे व व्यवसायांसाठी स्वच्छ ऊर्जेचा वापर सुलभ होणार आहे. कंपनीच्या मते, हा विस्तार PURE EV च्या देशव्यापी वाढीच्या धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. स्वदेशी संशोधन व उत्पादनावर भर देत कंपनी इलेक्ट्रिक मोबिलिटी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे.

# उज्वला हेग्गे होम मिनिस्टर

## वैरागच्या आण्णा ग्रुपची शिवजयंती लक्षवेधी ठरतेय!



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

गेल्या आठ वर्षांपासून वैराग(ता . बार्शी )येथील आण्णा ग्रूप शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने महिलांसाठी खास कार्यक्रम म्हणून होम मिनिस्टरचा महासंग्राम सोहळा घेतला जातो. या वर्षी आठव्या होम मिनिस्टर म्हणून उज्वला सागर हेग्गे ह्या ईलेक्टिक स्कुटर व पैठणीच्या मानकरी ठरल्या. तर द्वितीय फ्रीज बक्षीस सोनाली आनंद खेंदाड, तृतीय बक्षिस कुलर मयुरी बुरगुटे, चतुर्थ बक्षिस मिक्सर आरती ढेगळे, पाचवे बक्षिक होमथियटर रेश्मा काटमोरे यांनी पटकावले.या स्पर्धेत ५०० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.अभिनेते क्रांती (नाना) मळेगावकर यांनी आपल्या विनोदी अभिनयाने सोहळ्यांची रंगत वाढवली.......कविता राजेंद्र राऊत व रचनाताई संतोष निंबाळकर, नगरसेविका राणीताई वैजीनाथ आदमाने, अंकिता राऊत, मृणाल राऊत यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी नगरसेविका अर्चना माने रेड्डी, भाग्यशालीनी भालशंकर, सई शाहूराजे निंबाळकर, जयश्री घोडके, सविता खेंदाड, सुचिता कासार, अनिता मोहिते, संगीता खेंदाड, रुपाली करंडे या प्रमुखांसह शेकडों महिला उपस्थित होत्या.या सोहळ्यात संगीत खुर्ची, तळ्यात - मळ्यात, फुगे फोडणे, बॉल मारणे, जोड्या लावा, संगीत गाणी, रील उकळणे, खुमूसदार उखाने आदी खेळाच्या बहारदार स्पर्धा झाल्या.यामध्ये प्रथम बाजी उज्वला हेग्गे यांनी मारली.स्पर्धेतील सहभागी झालेल्या सर्व ५०० महिलांना आण्णा ग्रुप व मंडळाच्या वतीने आकर्षक भेट वस्तु देण्यात आली. .वैराग सारख्या ग्रामीण भागात आण्णा ग्रुप "होम मिनिस्टर पैठणीचा महासंग्राम सोहळा गेले ७ वर्ष झाले राबवत आहे या " कार्यक्रमाने महिलांवर्गातील सुप्त गुणांना वाव मिळतो आहे. कामांमध्ये सतत व्यस्त महिलांसाठी हे खेळ विरंगुळा ठरत आहेत.

शिवजयंती उत्सवात आण्णा ग्रुप मंडळाने असे कार्यक्रम राबवून आपल्या कार्याची आदर्शता जपल्याचे गौरव उद्गार कविता राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन पानबूडे यांनी केले तर आभार महेश पन्हाळे यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरसेवक वैजिनाथ आदमाने, मेजर जगन्नाथ आदमाने, आण्णा गाटे, संग्राम शिखरे, किरण वाघमारे, सतीश करंडे, राहुल पालकर, संदीप उमाप, जिन्नस उमाप, चेतन खेंदाड, अमोल जगदाळे, शाहरुख मुंढे, लखन वाघमारे, शाम बचुटे, वैभव खेंदाड, अण्णा उगले, गणेश शिंदे, कृष्णा खेंदाड, अनिल शिंदे, भाऊ उमाप या सर्व व आण्णा ग्रुपच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. वैरागच्या आण्णा ग्रुपने राबवलेल्या शिवजयंतीनिमित्त च्या विविध उपक्रमाची दखल यापूर्वीही सर्व स्तरातून घेतली जात आहे.. त्यामुळे हा अण्णा ग्रुपचा उत्सव सर्वत्र लक्षवेधी ठरत आहे.



## संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे मानाजी नगर येथील संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत आकर्षक सादरीकरण केले. पारंपरिक पोशाख परिधान करून विद्यार्थ्यांनी शिवगर्जना, पोवाडे आणि देशभक्तीपर घोषणा देत नऱ्हे परिसरात भव्य रॅली काढली. या रॅलीमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. कार्यक्रमास संकल्प प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. निलेश गिरमे, शाळेच्या अध्यक्षा सौ. राधिका गिरमे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. स्नेहल माळगे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थ्यांना शिवचरित्रावरील मार्गदर्शनही करण्यात आले. स्वराज्य, शौर्य आणि राष्ट्रप्रेम यांची शिकवण देत मुलांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परिसरातील नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांचे कौतुक केले. देशभक्ती आणि संस्कारांची जपणूक करणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## रोबोटिक सांधेरोपणासाठी आर्कस हॉस्पिटलमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ऑर्थोपेडिक उपचारांसाठी ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातील आर्कस हॉस्पिटलने जागतिक वैद्यकीय तंत्रज्ञान कंपनी Stryker Corporation यांच्यासोबत सहयोग करत रोबोटिक सांधेरोपण शस्त्रक्रियांसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन केले आहे. या उपक्रमांतर्गत भारतासह परदेशातील शल्यचिकित्सकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या केंद्रात 'डायरेक्ट अँटेरियर अ‍ॅप्रोच (DAA)' या स्नायूंना इजा न करणाऱ्या आधुनिक तंत्रावर विशेष भर दिला जाणार आहे. हे तंत्र आर्कस हॉस्पिटलचे संचालक डॉ. रोहित लुथ्रा यांनी २०१८ मध्ये प्रथम वापरले होते. ऑक्टोबर २०२३ पासून या पद्धतीने ६५० हून अधिक बायलॅटरल रोबोटिक हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. डॉ. लुथ्रा म्हणाले की, रोबोटिक तंत्रज्ञानामुळे रोपणाची




अचूक बसवणूक शक्य होते आणि रुग्ण शस्त्रक्रियेनंतर काही तासांत चालू शकतो. स्ट्रायकरचे भारतातील उपाध्यक्ष अमन ऋषी यांनी सांगितले की, ही भागीदारी आरोग्यसेवेत अत्याधुनिक रोबोटिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. रोबोटिक प्रणालीच्या साहाय्याने अचूकता, सुरक्षितता आणि जलद पुनर्वसन यांना चालना देत आर्कस हॉस्पिटलने सांधेरोपण क्षेत्रात नवा मापदंड निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

### *धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी*

## मोफत शिक्षण व निवासी सुविधेची सुवर्णसंधी

### संकल्प इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचा पुढाकार

**नऱ्हे, पुणे (दै. आरंभ पर्व)**

भटक्या जमातींतील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी संकल्प इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून विशेष मोफत शिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे.

या अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासोबत निवासी (वसतिगृह) सुविधा देण्यात येणार असून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणपद्धती, शिस्तबद्ध वातावरण, तसेच शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक विकासाच्या



विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गुणवंत विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहतात; अशा विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याबाबत माहिती देताना संस्थापक अध्यक्ष निलेश गिरमे म्हणाले की, "धनगर समाज हा परंपरेने कष्टकरी आणि भटक्या जीवनशैलीशी जोडलेला असल्यामुळे अनेक मुलांना शिक्षणाच्या संधी मर्यादित मिळतात. ही दरी कमी करण्यासाठी आणि समाजातील मुलांनीही डॉक्टर, अभियंता, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक अशा विविध क्षेत्रांत पुढे यावे, या उद्देशाने आम्ही मोफत शिक्षण योजना सुरू केली आहे. आधुनिक इंग्रजी माध्यमातून शिक्षण, राहण्याची सोय, संस्कारमूल्यांवर आधारित वातावरण आणि सर्वांगीण विकास यांचा संगम विद्यार्थ्यांना येथे मिळणार आहे. शिक्षण हीच खरी समाज परिवर्तनाची ताकद आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी या योजनेचा लाभ घ्यावा आणि समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सहकार्य करावे, ही आमची नम्र विनंती आहे."

**संस्थेच्या या उपक्रमामुळे धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची नवी दारे खुली झाली असून पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.**

**या संस्थेचा पत्ता : हर्षल कॉम्प्लेक्स, सर्व्हे नं. ४८/२६/५३, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, सिंहगड कॉलेज शेजारी, नऱ्हे, पुणे – ४१**

## मेडिकव्हर KLE हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक मान-मणक्याची शस्त्रक्रिया

### ५८ वर्षीय महिलेला पुन्हा चालण्याची क्षमता

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

Medicover KLE Hospital, पुणे येथे मान-मणक्याच्या गंभीर आजारामुळे चालण्यात अडचण येणाऱ्या ५८ वर्षीय महिलेवर यशस्वीपणे अत्याधुनिक शस्त्रक्रिया करण्यात आली असून उपचारानंतर तिच्या चालण्याच्या क्षमतेत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

सदर रुग्णाला गेल्या दोन महिन्यांपासून चालताना तोल जाणे व असंतुलन जाणवत होते. तपासणीनंतर तिला C4 ते D2 या मणक्यांदरम्यान OPLL (Ossification of Posterior Longitudinal Ligament) मुळे झालेला सर्व्हायकल मायेलोपॅथी



हा गंभीर आजार असल्याचे निदान झाले. या आजारात मणक्यातील मज्जारज्जूवर दाब येत असल्याने हालचालींवर परिणाम होतो. आवश्यक वैद्यकीय व हृदयविकार तज्ज्ञांकडून तपासणी व परवानगी घेतल्यानंतर न्यूरोसर्जन Dr. Ninad Ramesh Patil यांनी C4 ते D2 दरम्यान Cervical Decompressive Laminectomy ही शस्त्रक्रिया करून मज्जारज्जूवरील दाब यशस्वीपणे कमी केला. ही शस्त्रक्रिया कोणत्याही गुंतागुंतीशिवाय पार पडली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला आयसीयूमध्ये निरीक्षणाखाली ठेवण्यात आले. रक्तदाब नियंत्रण, मधुमेहाचे काटेकोर नियोजन तसेच फिजिओथेरपी सुरू करण्यात आली. उपचारांनंतर रुग्णाच्या खालच्या अंगांची ताकद ४/५ इतकी सुधारली असून ती आधारासह चालू लागली आहे. रुग्णाची प्रकृती स्थिर झाल्यानंतर तिला २९ जानेवारी २०२६ रोजी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून पुढील उपचार व तपासणीसाठी नियमित फॉलो-अपचा सल्ला देण्यात आला आहे.

यावेळी बोलताना डॉ. निनाद पाटील म्हणाले, "सर्व्हायकल मायेलोपॅथीच्या रुग्णांमध्ये वेळेवर शस्त्रक्रिया करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उशीर झाल्यास कायमस्वरूपी न्यूरोलॉजिकल अपंगत्व येण्याची शक्यता असते." Medicover KLE Hospital, पुणे हे अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर व बहुवैद्यकीय उपचारपद्धतीच्या सहाय्याने गुंतागुंतीच्या मणक्याच्या व मज्जासंस्थेच्या आजारांवर प्रभावी उपचार देत आहे.

## नागीणविषयी जागरूकतेचा अभाव; डॉक्टरांशी चर्चा नाहीच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

नागीण (शिंगल्स) हा वेदनादायक आजार असूनही भारतातील सुमारे निम्मे प्रौढ त्याच्या प्रतिबंधाबाबत डॉक्टरांशी चर्चा करत नाहीत, अशी धक्कादायक बाब एका जागतिक सर्वेक्षणातून समोर आली आहे. ५० वर्षांवरील आणि दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त प्रौढांवर नागीणीचा मोठा परिणाम होत असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. नागीण कृती सप्ताह (२३ फेब्रुवारी–१ मार्च २०२६) निमित्त करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात नागीण झालेल्या ४३% भारतीयांनी दैनंदिन जीवनात अडथळा आणणारी तीव्र वेदना अनुभवली असल्याचे सांगितले. तर तीनपैकी एका व्यक्तीने या आजारामुळे काम किंवा सामाजिक कार्यक्रमांपासून दूर राहावे लागल्याचे नमूद केले. मूत्रपिंडाचे आजार (सीकेडी) आणि हृदयविकार (सीव्हीडी) असलेल्या रुग्णांमध्ये नागीणीचा सर्वाधिक परिणाम दिसून आला. नागीण हा व्हेरिसेला-झोस्टर विषाणूमुळे होणारा आजार असून वय वाढल्यास रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे त्याचा धोका वाढतो. हा आजार प्रामुख्याने शरीराच्या एका बाजूला पुरळ आणि वेदनादायक फोडांच्या स्वरूपात दिसून येतो. तज्ज्ञांच्या मते, नागीण टाळण्यासाठी लसीकरण हा प्रभावी उपाय आहे.

# स्वर-विक्रमाचा नवा 'पहाड' : पुण्यात रंगला १११ गाण्यांचा नऊ तासांचा सोहळा

## पुण्याची 'नादसप्तक' आता जागतिक विक्रमाच्या उंबरठ्यावर!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संगीताच्या क्षेत्रात एक नवा अध्याय रचण्यासाठी गिरीशजी पंचवाडकर आणि त्यांच्या 'नाद सप्तक' टीमने ९ तासांत पहाडी रागातील १११ गाणी सादर करण्याचा अनोखा विक्रम करण्याचा संकल्प हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे गौरवोदगार खासदार मेधा कुलकर्णी यांनी काढले.




पुण्यातील "नादसप्तक संगीत विद्यालय" यांच्या वतीने भारतीय लोकसंगीत व शास्त्रीय संगीत परंपरेतील अत्यंत मधुर, आणि लोकप्रिय,राग पहाडीवर आधारित १११ हिंदी व मराठी गीतांची आगळीवेगळी 'सूर पहाडी' ही भव्य संगीत मैफल बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी प्रख्यात निवेदक आनंद देशमुख, जेष्ठ टाळवादक माउली टाकळकर, आशिया बुक of रेकॉर्ड्स चे अधिकृत परीक्षक अशोक अडक,प्रख्यात गायक व संगीतकार गिरीश पंचवाडकर, युवा तबला वादक अक्षय पंचवाडकर हे यावेळी उपस्थित होते. प्रख्यात निवेदक आनंद देशमुख, जेष्ठ टाळवादक माउली टाकळकर यांचा त्यांच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल "मानपत्र " देऊन विशेष सन्मान मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला. "तुमचा सत्कार आमच्या हस्ते होणे, हा आमचा बहुमान आहे," अशी भावना मेधा कुलकर्णी यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन प्रख्यात गायक व संगीतकार गिरीश पंचवाडकर यांची आहे. या मैफलीत गिरीश पंचवाडकर यांच्यासह नादसप्तक संगीत विद्यालयातील १९ वर्षे ते ९९ वर्षे वयातील २५ विद्यार्थ्यांनी राग पहाडीवर आधारित भावगीत, भक्तिगीत, नाट्यगीत, लावणी, अभंग, तसेच संत ज्ञानेश्वर माऊली व संत रामदास यांच्या अभंगांचे सादरीकरण केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.